अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपिल क्र. ३८/२०१८
जा.क्र उआ (सा.प्र.)/ ९७२८ दि. २३/१/२०१९

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/३८/२०१८

**श्री पांडुरंग निवृत्ती गायकवाड**
फ्लॅट नं. एफ २०२ मिथीला नगरी,
पिंपळे सौदागर, पुणे ४११०२७

------------------- अपिलार्थी

विरुद्ध

१) **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका**

२) **जन माहिती अधिकारी तथा सहा. आरोग्य अधिकारी
आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

**श्री पांडुरंग निवृत्ती गायकवाड** रा. फ्लॅट नं. एफ २०२ मिथीला नगरी, पिंपळे सौदागर, पुणे ४११०२७ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. ३१.१०.२०१८ रोजी अर्ज करून “१) मा. महापालिका आयुक्त यांचेकडे स्वागतकक्ष क्र. २०८४ दि. ३१.१.२०१८ रोजी दिलेल्या निवेदनावर प्रशासनाने घेतलेला निर्णय व टिपण्णी ची माहिती मिळणे बाबत. २) मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी पुणे मनपा जा. क्र. मुले/३०३४ दि. ०८.०८.२०१८ यांचे मा. उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे मनपा यांना प्रसूत पत्रात बायोकेमिस्ट हे पद अतांत्रिक असताना ते दुय्यम नाही. एल. जी. एस. पदविका परीक्षा उत्तीर्ण असून त्यांना केवळ एक वेतनवाढ देण्यात येईल याबाबत वर्ग १ व वर्ग २ साठीच सुपरवायझरी पदास असताना त्याची कार्यवाही न करता मा. उप आयुक्त यांनी सदर बाबत सुधारित कार्यालयीन परिपत्रक प्रसृत झाल्यास त्याची प्रत व शासन निर्णयाची प्रत मिळावी.” या दोन मुद्या बाबत माहिती मागितली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/७५०५ दि. १४.११.२०१८ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे. तसेच जन माहिती अधिकारी तथा सहा. आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. शा.मा.अ./एच/ओ/८९३ दि. २९.१२.२०१८ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ३१.१०.२०१८ | ३१.१०.२०१८ | ३०.११.२०१८ | १४.११.२०१८ (आस्थापना विभाग)<br>२९.१२.२०१८ (आरोग्य विभाग) | ०<br>२९ |

अपिलार्थी यांचे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी अपील क्र. ३८/२०१८ चा अपील अर्ज दि. १९.१२.२०१८ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १९.१२.२०१८ | १९.१२.२०१८ | १३.१२.२०१८ | ६ दिवस उशिरा | नाही. |

सदर प्रकरणी दि. ११.०१.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी **श्री पांडुरंग निवृत्ती गायकवाड** रा. फ्लॅट नं. एफ २०२ मिथीला नगरी, पिंपळे सौदागर, पुणे ४११०२७ हे उपस्थित होते. श्री रवींद्र शेडगे **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,** आस्थापना विभाग, पुणे मनपा व **जन माहिती अधिकारी तथा सहा. आरोग्य अधिकारी,** आरोग्य विभाग, पुणे मनपा यांचे प्रतिनिधी श्रीमती अलका येडे (कोकणे) हुद्दा उप अधीक्षक हे उपस्थित होते

**विवेचन**

अपिलार्थी **श्री पांडुरंग निवृत्ती गायकवाड** रा. फ्लॅट नं. एफ २०२ मिथीला नगरी, पिंपळे सौदागर, पुणे ४११०२७ यांनी त्यांचे म्हणणे अपिलात लेखी सादर केले. तर **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,** आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/७५०५ दि. १४.११.२०१८ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे. असे प्रतिपादन केले. **जन माहिती अधिकारी तथा सहा. आरोग्य अधिकारी,** आरोग्य विभाग, पुणे मनपा यांचे प्रतिनिधी श्रीमती अलका येडे (कोकणे) हुद्दा उप अधीक्षक यांनी जा. क्र. शा.मा.अ./एच/ओ/८९३ दि. २९.१२.२०१८ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे. असे प्रतिपादन केले.

## <u>आदेश</u>

अपिलार्थी यांची विनंती अंशत: मान्य करण्यात येत आहे. अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ (स्वागतकक्ष क्र. २०८४ दि. ३१.१.२०१८ ) बाबत **जन माहिती अधिकारी तथा सहा. आरोग्य अधिकारी,** आरोग्य विभाग, पुणे मनपा यांनी ७ दिवसात अपिलार्थी यांना माहिती विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. मुद्दा क्र. १ व मुद्दा क्र. २ हे वेगळे विषय असल्याने मुद्दा क्र. २ बाबत अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,** आस्थापना विभाग, पुणे मनपा यांचेकडे स्वतंत्र अर्ज करता येईल. अपील क्र. ३८/२०१८ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका